अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

▸ वर्ष : २४ वे ▸ अंक : १२४ वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने १२

www.surajyadigital.com । रविवार, दि. १ फेब्रुवारी २०२६ ।

# नेतृत्व सुनेत्राताईंचे



# मिलन दोन्ही राष्ट्रवादीचे!

## अजितदादांची स्वप्नपूर्ती

## पार्थ-शरद पवार भेटीने चमत्कार

✔ सोलापूर/प्रतिनिधी

**सुनेत्रा पवारांच्या शपथविधीबाबत माहिती नसल्याचं सांगत शरद पवारांनी नाराजी व्यक्त केल्यानंतर पार्थ पवारांनी त्यांची भेट घेतली. या भेटीनंतर पवार कुटुंबाने राजकीयदृष्ट्या एकत्र येण्याचा मोठा निर्णय घेतला असून सर्व गैरसमज दूर झाल्याचं सांगण्यात आलं आहे.**

एकीकडे सुनेत्रा पवार यांचा उपमुख्यमंत्रिपदाचा शपथविधी आज मुंबईत होत असतानाच दुसरीकडे आपल्याला याविषयी माहिती नाही किंवा विश्वासात घेतलेलं नाही, असं सांगून ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी आज सकाळी राज्याच्या राजकारणात खळबळ उडून दिली होती. त्यानंतर विविध तर्क-वितर्क लढवले जात असताना पार्थ पवार हे शरद पवारांना भेटायला गेले. या दरम्यान झालेल्या बैठकीत काय तपशील होता, हे सुरुवातीला कळू शकले नाही. त्यानंतर पार्थ पवार हे काहीही न बोलता बैठकीतून निघून गेले. काही वेळानंतर आमदार रोहित पवार आणि युगेंद्र पवार एकाच गाडीतून आले. मात्र तेदेखील काहीही न बोलता निघून गेले. परंतु त्यानंतर एक तासानंतर महत्त्वाची माहिती समोर आली असून पार्थ पवारांच्या भेटीने सर्व चित्र पालटलं असून पवार कुटुंबाने राजकीयदृष्ट्या एकत्र येण्याचा निर्णय घेतला आहे. याबाबतची माहिती विद्या प्रतिष्ठानचे विश्वस्त आणि दिवंगत अजित पवार यांचे अत्यंत विश्वासू अशी ओळख असलेल्या किरण गुजर यांनी दिली आहे. किरण गुजर यांनी दिलेल्या माहितीनुसार, पार्थ पवार यांनी आज शरद पवार यांच्यासह पवार कुटुंबाच्या घेतलेल्या भेटीत त्यांना शपथविधी सोहळ्याचे निमंत्रण दिले. शपथविधी सोहळ्यावरून जे समज-गैरसमज झाले होते, ते दूर करण्यात आले आहेत आणि पवार कुटुंबाने राजकीदृष्ट्या एकत्र येण्याचा निर्णय घेतला आहे, असा दावा गुजर यांनी केला आहे. मी अजित पवार यांच्या सहयोग निवासस्थानी पार्थ पवार यांची भेट घेत तिथं त्यांच्याबरोबर चर्चा केली आणि त्यानंतर अजित पवार यांचे राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाचे स्वप्न कोणत्याही परिस्थितीत साकार करायचं, असं आम्ही ठरवलं आहे. त्यामुळे दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येणारच. या संदर्भात मी पार्थ यांच्याशी चर्चा केली आहे, अशी माहिती देखील किरण गुजर यांनी दिली आहे.

मी सकाळी जेष्ठ नेते शरद पवार, खासदार सुप्रिया सुळे, आमदार रोहित पवार, पार्थ पवार, युगेंद्र पवार, राजेंद्र पवार, रणजीत पवार यांच्या बरोबरील चर्चेत सहभागी होतो. तेथे चर्चा झाल्यानंतर मी पुन्हा नव्याने स्वतंत्रपणे सहयोग निवासस्थानी पार्थ पवार यांच्याशी चर्चा केली आणि त्यांनी कोणत्याही परिस्थितीत दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येणार असे सांगितल्यानंतर मी माझी भूमिका मांडत आहे, असं किरण गुजर म्हणाले.

बैठकीनंतर माध्यमांशी बोलताना किरण गुजर यांनी सर्व चित्र स्पष्ट केलं. शपथविधीबाबत पवार कुटुंबात निर्माण झालेले गैरसमज दूर करण्यात आले आहेत. दोन्ही राष्ट्रवादी एक व्हाव्यात, हे अजितदादांचं स्वप्नं होतं आणि हे स्वप्न पूर्ण करण्याचा निर्णय पवार कुटुंबाने घेतला आहे, असं गुजर यांनी स्पष्ट केलं. तसंच सहयोग सोसायटी इथं मी पार्थ पवार यांच्यासोबत स्वतंत्र चर्चा केली असून त्यांनीही राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाबाबतचीच भूमिका मांडली, असं गुजर यांनी स्पष्ट केलं.

# मी सुनेत्रा अजित पवार शपथ घेते की...;

## महाराष्ट्रातील पहिल्या महिला उपमुख्यमंत्र्यांनी घेतली शपथ, अत्यंत साधेपणाने पार पडला सोहळा

✔ **मुंबई** : राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे बारामती येथे झालेल्या विमान दुर्घटनेत निधन झाल्यानंतर राज्यासह देशभरातून शोक व्यक्त केला जात आहे. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने महत्त्वाचा निर्णय घेत अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांची शनिवार (ता.३१) विधिमंडळ पक्षनेतेपदी निवड केली आहे. त्यानंतर त्यांनी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली आहे. मोजक्या नेत्यांच्या उपस्थितीत अत्यंत साधेपणाने हा शपथविधी सोहळा लोकभवनातील दरबार हॉलमध्ये पार पडला. राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी सुनेत्रा पवार यांना मंत्री म्हणून पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. या कार्यक्रमासाठी राज्यपाल आचार्य देवव्रत, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मुख्य सचिव आणि राजशिष्टाचार अधिकारी उपस्थित होते.

सुनेत्रा पवार या शुक्रवारी रात्रीच बारामतीतून मुंबईकडे रवाना झाल्या होत्या. आज सकाळपासून मुंबईत राजकीय घडामोडींना वेग आल्याचे पाहायला मिळाले होते. सुनेत्रा पवारयांची

(अधिक वृत्त पान ७ वर...)



### सुनेत्रा पवार तातडीने बारामतीत दाखल; दुखवटा संपेपर्यंत त्या थांबणार बारामतीतच

उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतल्यानंतर सुनेत्रा पवार तातडीने बारामतीला रवाना झाल्या अजित पवार यांचा दहावा होईपर्यंत त्या बारामतीतच मुक्काम करणार आहेत. सूत्रांच्या माहितीनुसार, दुखवटा संपेपर्यंत त्या नेते व कार्यकर्त्यांची भेट घेणार असल्या तरी, या काळात कोणतेही हार, तुरा किंवा सत्कार स्वीकारणार नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. शोकाकुल वातावरणात साधेपणा आणि संवेदनशीलता जपण्यावर त्यांचा भर असणार आहे.

# घरापासून राजकारणापर्यंत दिली साथ

✔ **बारामती:** लग्नानंतर अजित पवार यांच्यासोबत शेतकाम, पोल्ट्री व्यवसाय ते गाईगुरे सांभाळणे, दूध काढणे अशी सर्व कामं सुनेत्रा पवार यांनी आवडीने केली. अजित पवार यांच्या राजकीय वाटचालीत आपली घरं सांभाळणे, नातेसंबंध जपणं, सामाजिक कार्य करणं, कठीणप्रसंगी दादांना साथ देणं आणि सल्लामसलत करणं, ही जबाबदारी त्यांनी पार पडली.

सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेताच त्यांच्या नावावर आज पहिली महिला उपमुख्यमंत्री असा एक मोठा विक्रम होणार आहे. या आधी कोणत्याही महिलेने या पदावर काम केलेले नाही. राष्ट्रवादी काँग्रेसच्या फुटीनंतर २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत सुनेत्रा पवार यांचा प्रत्यक्षामध्ये राजकारणात प्रवेश झाला. त्यापूर्वी पवार कुटुंबातील प्रत्येक निवडणुकीवेळा त्या उत्साहाने प्रचारात उतरत असत आणि बारामतीमध्ये आत्तापर्यंत मिळालेल्या अनेक विक्रमी विजयांमध्ये त्यांचा मोलाचा वाटा राहिला. पक्षफुटीनंतर सुप्रिया सुळेंविरोधात त्या लोकसभा निवडणुकीत



उतरल्या आणि त्यांना पराभव पत्करावा लागला, यानंतरही त्या खचल्या नाहीत.त्या जनसेवेत सक्रिय राहिल्यानंतर त्यांना राज्यसभेवर पाठवण्यात आले. राज्यसभा खासदार म्हणून काम करत असतानाच त्यांना तालिका अध्यक्षपदाची जबाबदारी मिळाली आणि देशाच्या सर्वोच्च सभागृहाच्या अध्यक्ष आसनावर विराजमान होण्याचा मान मिळाला. आता अजित पवारांच्या निधनानंतर त्या उपमुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली.

### पंतप्रधान मोदींकडून शुभेच्छा

शपथविधी सोहळ्यानंतर लगेचच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोशल मीडियाद्वारे सुनेत्रा पवार यांचे अभिनंदन केले आहे. महाराष्ट्राच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री म्हणून जबाबदारी स्वीकारल्याबद्दल सुनेत्रा पवारजी यांचे मन:पूर्वक अभिनंदन. त्या जनहितार्थ अथक परिश्रम करतील आणि दिवंगत अजितदादा पवार यांचे 'व्हिजन' यशस्वीपणे पुढे नेतील, असा मला ठाम विश्वास आहे, अशा शब्दांत पंतप्रधानांनी सुनेत्रा पवारांना शुभेच्छा दिल्या आहेत.

### राजकीय अपरिहार्यता

विधानसभा निवडणुकीत महायुतीने मिळवलेल्या ऐतिहासिक विजयानंतर अजित पवार यांनी उपमुख्यमंत्रीपदाची धुरा सांभाळली होती. अर्थ आणि क्रीडा यांसारखी महत्त्वाची खातीदेखील त्यांच्याकडे होती. मात्र, २८ जानेवारी रोजी बारामतीकडे जाताना झालेल्या दुर्दैवी विमान अपघातात त्यांचे निधन झाले. या धक्कादायक घटनेनंतर अजित पवार राष्ट्रवादी काँग्रेसच्या विधिमंडळ पक्षाने सुनेत्रा पवार यांची गटनेता म्हणून एकमताने निवड केली. या नियुक्तीनंतर त्यांनी आपल्या खासदारकीचा राजीनामा देऊन उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली आहे.

# अर्थ आणि नियोजन खातं देवाभाऊंकडे; सुनेत्राताईंकडं तीन खात्यांचा दिला पदभार

✔ **मुंबई** : उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतल्यानंतर सुनेत्रा पवार यांना कोणती खाती मिळणार याकडे सर्वांचं लक्ष लागलं होतं. शपधविधीनंतर काही वेळातच खातेवाटपही जाहीर करण्यात आलं आहे.

अजित पवार यांच्याकडील अर्थ खातं सुनेत्रा पवारांना मिळणार का याची उत्सुकता होती. मात्र दादांकडील अर्थ खाते वगळून अन्य खात्यांची धुरा सुनेत्रा पवारांकडे देण्यात आली आहे. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्याकडे राज्य उत्पादन शुल्क, क्रीडा व युवक कल्याण आणि अल्पसंख्याक विकास व औकाफ खात्याची धुरा देण्यात आली आहे. अर्थ व नियोजन खातं मात्र मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे राहणार आहे. अजित पवार यांच्याकडे असलेली तिन्ही खाती सुनेत्रा पवार यांच्याकडेच आहे. मात्र, अर्थ खातं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडेच राहील. त्यामुळे राज्याचा अर्थसंकल्प आता देवेंद्र फडणवीस मांडणार यावर शिक्कामोर्तब झालं आहे. राष्ट्रवादीला अर्थ खातं मिळावं, यासाठी अजित पवार फार आग्रही होते. म्हणून खातेवाटप होताना अर्थ खातं हे राष्ट्रवादीला देण्यात आलं होतं. शिवसेनेला नगर विकास आणि भाजपकडे महसूल आणि गृह ठेवण्यात आलं होतं. अर्थ खातं राष्ट्रवादीकडून गेल्याने मोठं खात आता राष्ट्रवादीकडे नाही.

### अर्थसंकल्प मांडणार मुख्यमंत्री

उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांना अजित पवार यांच्याकडे असलेली तीन खाती देण्यात आली आहे. क्रीडा व युवक, राज्य उत्पादन शुल्क आणि अल्पसंख्यांक विकास ही खाती सुनेत्रा पवार यांच्याकडे असतील. अजित पवार यांच्याकडे असलेले अर्थखातं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे राहणार आहे. म्हणजेच राज्याच्या २०२६-२७ चा अर्थसंकल्प देवेंद्र फडणवीस सादर करतील, हे स्पष्ट झालं आहे.

### सुनेत्रा पवार यांचा अर्थ खातं का दिलं गेलं नाही?

सुनेत्रा पवार यांना अर्थ खातं का देण्यात आल नाही यासंदर्भातील नवी माहिती समोर आली आहे. सध्या सुनेत्रा पवार यांच्याकडे प्रशासकीय अनुभवाची कमतरता आहे. राज्याचा अर्थसंकल्प ६ मार्च रोजी मांडला जाणार आहे. अर्थसंकल्पीय अधिवेशन तोंडावर असताना लगेच अनुभव नसताना खातं देणं जिकिरीचे असू शकतं. अजित पवार यांच्याकडून २०२६-२७ ची तयारी जवळपास पूर्ण करण्यात आल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.अशात, शेवटचा हात फिरवताना आणि बदल सुचवायचे असल्याने अडचणीचं गेलं असतं. यामुळं सध्या अर्थखातं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे ठेवण्यात आलं आहे. राष्ट्रवादीसोबत समन्वय राखतच मुख्यमंत्र्यांकडे खातं ठेवण्यात आल्याची सूत्रांची माहिती आहे.

# पॉवर गेम! मॅरेथॉन घडामोडी शरद पवारांचं मोठं विधान

## मुंबईत हालचाली अन् सुनेत्रा पवार उपमुख्यमंत्री

**२८ जानेवारी : दादांचं अकाली निधन, महाराष्ट्र शोकसागरात**

▪ अजित पवार यांच्या अकाली निधनानंतर संपूर्ण महाराष्ट्रावर शोककळा पसरली. अजित पवार यांच्या पार्थिवावर २९ जानेवारीला शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार झाले. त्यानंतर ३० जानेवारीला अजित पवार यांच्या अस्थी नीरा नदीत विसर्जित करण्यात आल्या. याच दिवसापासून राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये पुढील नेतृत्त्वाबद्दल खल सुरु झाला. अखेर सुनेत्रा पवार यांनाच अजित पवार यांच्या उत्तराधिकारी करण्याचा निर्णय घेण्यात आला. यामागचा घटनाक्रम लक्षवेधी आहे.

**३० जानेवारी : सकाळी दोन्ही राष्ट्रवादींच्या विलीनीकरणाची चर्चा**

▪ दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलीनकरणाची चर्चा गेल्या तीन ते चार महिन्यांपासून सुरु होती, असा दावा ३० जानेवारीच्या सकाळपासून शरद पवारांच्या पक्षातील अनेक वरिष्ठ नेत्यांनी सुरु केला. शशिकांत शिंदे, अनिल देशमुख, राजेश टोपे यांच्या सारखे महत्त्वाचे नेते विलीनीकरणावर बोलले. दोन्ही पक्ष एक व्हावेत, हीच अजित पवारांची इच्छा होती. त्यांची शेवटची इच्छा पूर्ण व्हायला हवी, असंही बोललं गेलं.

**३० जानेवारी : दुपारी अचानक ट्विस्ट**

▪ याच सुमारास मुंबईत वेगळ्याच घडामोडी सुरु झाल्या. अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे वरिष्ठ नेते प्रफुल्ल पटेल, सुनील तटकरे, छगन भुजबळ, धनंजय मुंडे यांची एक बैठक झाली. विधिमंडळाचा गटनेता कोण होणार, उपमुख्यमंत्रिपदी कोण बसणार, यावर चर्चा झाली. त्यात सुनेत्रा पवार यांचं नाव जवळपास निश्चित झालं.

**३० जानेवारी : संध्याकाळी मुख्यमंत्र्यांची भेट**

▪ मंत्री छगन भुजबळांनी माध्यमांशी संवाद साधला. प्रफुल्ल पटेल आणि सुनील तटकरे यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांची भेट घेतली आहे. विधिमंडळाच्या नेत्या म्हणून सुनेत्रा पवार यांचं नाव निश्चित करण्यासाठी उद्या आमदारांची बैठक होईल. बहुधा उद्याच त्यांचा शपथविधी होईल, अशी माहिती भुजबळ यांनी दिली.

**३० जानेवारी : रात्री सुनेत्रा पवार मुंबईला रवाना**

▪ संध्याकाळी नीरा नदीत अजित पवारांचं अस्थी विसर्जन झालं. यानंतर पुढील काही तासांमध्ये सुनेत्रा पवार मुंबईला कारनं रवाना झाल्या. त्यांच्या सोबत पुत्र जयदेखील होते.



**घडलं बिघडलं**

इनसाईड स्टोरी

**३१ जानेवारी : सकाळी पवारांचे मोठे विधान**

▪ सुनेत्रा पवार उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेणार असल्याची कोणतीही कल्पना मला नाही. ही बातमी मला वर्तमानपत्रातून समजली. त्यांच्या पक्षानं हा निर्णय घेतला असेल, असं शरद पवार पत्रकारांशी संवाद साधताना म्हणाले. सगळे निर्णय मुंबईतून होत आहेत. हा निर्णय कुटुंबात झालेला नाही, ही बाब पवारांनी अप्रत्यक्षपणे सुचवली.

**३१ जानेवारी : विलीनीकरणावर दादांच्या राष्ट्रवादीच्या बड्या नेत्यांचं मौन**

▪ दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलीनीकरणाबद्दल शरद पवारांचे नेते बोलत असताना अजित पवारांच्या पक्षातील नेत्यांनी मौन बाळगलं. आता केवळ विधिमंडळाचा नेता आणि उपमुख्यमंत्री हे दोनच विषय अजेंड्यावर असल्याचं तटकरे आणि भुजबळ यांच्याकडून सांगण्यात आलं.

**३१ जानेवारी : दुपारी सुनेत्रा पवार विधिमंडळ गटनेतेपदी**

▪ दुपारी दोनच्या सुमारास राष्ट्रवादी काँग्रेसच्या सर्व आमदारांची बैठक झाली. त्यांनी एकमतानं सुनेत्रा पवार यांची निवड विधिमंडळाच्या गटनेतेपदी केली. याबद्दलचा प्रस्ताव मंत्री दिलीप वळसे पाटील यांनी ठेवला. तर मंत्री छगन भुजबळ यांनी त्याला अनुमोदन दिलं.

**३१ जानेवारी : संध्याकाळी सुनेत्रा पवार यांचा शपथविधी**

▪ संध्याकाळी पाच वाजता सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. त्यावेळी अजित पवार यांच्या समर्थकांनी 'अजित पवार अमर रहे'च्या घोषणा दिल्या. सुनेत्रा पवार भावुक झाल्या. यावेळी राष्ट्रवादीचे वरिष्ठ नेते, मंत्री आणि आमदार उपस्थित होते. सुनेत्रा पवार महाराष्ट्राच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री ठरल्या आहेत.

**३१ जानेवारी : संध्याकाळी- खाती जाहीर**

▪ उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्याकडील खाती जाहीर करण्यात आली. त्यांच्याकडे उत्पादन शुल्क, क्रीडा आणि युवक कल्याण, अल्पसंख्याक विकास ही खाती देण्यात आली. अजित पवारांकडील अर्थ खातं त्यांना देण्यात आलेलं नाही. हे खातं मुख्यमंत्री फडणवीस यांनी त्यांच्याकडेच ठेवलं आहे.

**उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनानंतर राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये वेगवान घडामोडी सुरु झाल्या, बैठकांचं सत्र सुरु झालं. यानंतर शनिवारी सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. या दरम्यान मोठ्या घडामोडी पडद्याआड आणि पडद्यावर घडल्या. खूप काही घडलं-बिघडलं. त्याची ही इनसाईड स्टोरी...**



## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे




आज रविवार असला तरी सुट्टी नाही !

कल्याण

700-70-235